नि.दि.दा. १०१/२०१६

नि.क्र. ५२ सोबत

**<u>वादीतर्फे सा. क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.पी.जी.इंगळे यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

९. दावाकलम १ क मधील जमीन आमच्याकडे हक्कसोडपत्राने आली. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ व २ व प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे जी जमीन आली ती सिताराम बापू खेतमाळीस यांनी वाटून दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ यांना प्रत्येकी १ गुंठा व मला दोन गुंठे जमीन वाटून देण्यात आलेली आहे. अशोक याची जमीन माझ्या जमीनीच्या पश्चिम दिशेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दोघांच्या जमीनीतून एक रस्ता जातो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमीनीतून तो रस्ता गेल्याने मला दोन गुंठे जमीन देण्यात आली. तो रस्ता त्या गटातील सर्वांच्या जमीनीतून गेलेला आहे. भाउसाहेब खेतमाळीस यांची जमीन अशोक खेतमाळीस यांच्या जमीनीच्या दक्षिणेला व उत्तरेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, भाउसाहेब खेतमाळीस यांच्या उत्तर दिशेची जमीन व प्रतिवादी क्र.१ यांची जमीन यामधून एक रस्ता गेलेला आहे. वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ यांच्या जमीनीच्या पश्चिम दिशेला डांबरी रस्ता आलेला आहे. त्या रस्त्यापैकी अर्धा रस्ता गट क्र. ४५३ व उर्वरीत रस्ता ४५६ व ४५७ मधून आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याचे क्षेत्र ७/१२ उता–यावरुन कमी झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जमीनीची मोजणी ही रस्त्याचे क्षेत्र समाविष्ट करुन झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम १ क मधील जमीन मी माझे भाउ बापू तुकाराम खेतमाळीस व माझी पत्नी रेखा रोहिदास खेतमाळीस यांच्या नावावर करुन दिलेली आहे. हे म्हणणे खेर आहे की, ती जमीन सध्या माझ्या नावावर नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, अशोक याच्या जमीनीच्या उत्तरेकडील दोन गुंठे जमीन मी प्रतिवादी क्र.७ यांच्याकडून खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, ती जमीन दावा मिळकतीमध्ये समाविष्ट नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३, प्रतिवादी क्र.५ व प्रतिवादी क्र.७ यांच्या नावावर कोणतेही क्षेत्र नाही. गट क्र. ४५३ चा नवीन ७/१२ उतारा मी पाहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४५३ या जमीनीच्या ७/१२ वरील सर्व खातेदार हे प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार नाहीत.

नि.दि.दा. १०१/२०१६

**नि.क्र. ५२ सोबत**

**११.** मोजणीच्या वेळेस मी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्या वेळेस ज्या वहिवाटीच्या खूणा दाखवल्या त्या रस्त्याचे क्षेत्र वगळून दाखवण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४५३ च्या पश्चिमेला गट क्र. ४५६ व ४५७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ यांच्या जमीनीच्या पश्चिमेला गट क्र. ४५७ मध्ये लक्ष्मण सोनबा खेतमाळीस व ज्ञानदेव रामभाउ खेतमाळीस यांची ३ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची ३ आर जमीन त्यांनी १९८६ साली तबा खेतमाळीस यांच्याकडून खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर ३ आर जमीनीच्या उत्तरेला लक्ष्मण खेतमाळीस यांनी पुर्व–पश्चिम असा रस्ता ठेवला होता.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, आमचे जे क्षेत्र कमी भरत आहे ते रस्त्यामध्ये गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याच्या नावावर जे जास्त क्षेत्र दिसत आहे ते रस्त्यामध्ये गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी नकाशामध्ये दाखवल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ याने कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

HAMIDKHA JANIKHA PATHAN

Digitally signed by HAMIDKHA JANIKHA PATHAN
Date: 2024.10.04 18:05:40 +0530

ठिकाणः श्रीगोंदा

**(एच. जे. पठाण)**

दिनांक ०३/१०/२०२४.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, श्रीगोंदा